महासागर अमरावती
रविवार, दि. 6 ऑक्टोंबर 2024
पान 3

# मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल चौथ्या पक्षात करणार प्रवेश

## भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, जनशक्ती प्रहार पक्षानंतर धनुष्य बाणाच्या वाटेवर

**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.5 )-** यंदा प्रहारवर जोर लागणार नसल्याचे चिन्ह दिसत असल्याने मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांनी आपल्या सवयीप्रमाणे पक्ष बदल करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. ते शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश करुन धनुष्यबाण या चिन्हावर निवडणूक लढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. 10 ऑक्टोबर रोजी धारणी येथे आयोजित कार्यकर्ता संमेलनामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार आहे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, जनशक्ती प्रहार पक्षानंतर आ.पटेल यांचा हा चौथा पक्ष राहणार आहे.




लोकसभेमध्ये बच्चु कडूंसोबत असताना नवनित राणांच्या विरोधात काम केल्याने राजकुमार पटेल यांना आता प्रहार पक्षावर लढणे कठीण वाटत आहे. त्यामूळे महायुतीमध्ये राहील्यास नवनित राणांकडून आपल्या विरोधात होत असलेली व्युव्हरचना निकामी होईल, असा विश्वास आ.पटेल यांना वाटत आहे. कारण भाजपला लोकसभेमध्ये मेळघाटात तीस हजाराची लीड मिळाली होती. भाजप आपल्या सोबत राहील्यास आपल्यास या लीडचा लाभ कायम राहील असे गणित लावत आ.पटेल यांनी हा निर्णय घेतला असल्याची माहिती आहे.

### होर्डींग्जवर बच्चू कडूंचा फोटो नाही

उद्या रविवार 6 ऑक्टोबर रोजी सकाळी 11 वाजता बालाजी मंगलम धारणी येथे आ.पटेल यांनी संवाद संमेलनाचे आयोजन केले आहे.या संवाद संमेलनाच्या पोस्टरवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महापुरुष आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे फोटो दिसत आहेत, त्याचप्रमाणे माजी मंत्री आणि मेळघाटचे दिवंगत आमदार दयाराम नानू पटेल यांचाही फोटो दिसत आहे. या होर्डींग्ज बच्चू कडूंचा फोटो नसल्याने आ.पटेल यांनी शिवसेनेत जाण्याची पुर्ण तयारी केली असल्याचे दिसत आहे.

### बच्चु कडूंना घेतले विश्वासात

राजकुमार पटेल यांनी प्रहार पक्षाचे प्रमुख बच्चु कडू यांना विश्वासात घेवून हा निर्णय घेतल्याची माहिती आहे. शिवसेना प्रवेशानंतर बच्चु कडू तिसऱ्या आघाडीकडून कोणता उमेदवार मेळघाटात उभा करतील हे पाहण्यासारखे राहील. गेल्या तीन दिवसांपासून कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर पटेल यांनी एकनाथ शिंदे यांचे निमंत्रण स्विकारले. आ.पटेल यांनी चार दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याची माहिती आहे.

# महायुतीच्या काळात महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास हे प्रगतीचे द्योतक!

## भाजपा नेते डॉ. अनिल बोंडे यांची पत्रकार परिषद

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 ) –** महायुतीच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होत आहे. लाडकी बहीण, शेतकरी, युवा, समाजातील विविध वर्ग, समाज घटक यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणून महाराष्ट्राची मजबुतीने वाटचाल सुरू आहे, हे राज्याच्या सर्वांगीण विकासाच्या प्रगतीचं द्योतक आहे, असा दावा भाजप जिल्हाध्यक्ष खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी एका पत्रकार परिषदेतून केला.

शासकीय विश्रामगृह येथे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधत जिल्ह्यात भाजप तर्फे महासंपर्क अभियानाला थाटात सुरुवात झाल्याची माहिती दिली. भाजपा अमरावती ग्रामीण तर्फे आयोजित पत्रकार परिषदेला आमदार प्रताप अडसड, माजी आमदार रमेश बुंदिले, केवलराम काळे, प्रभुदास भिलावेकर, दिनेश सूर्यवंशी, किरण महल्ले आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी माहिती देताना भाजप नेते अनिल बोंडे म्हणाले की, आगामी विधानसभा निवडणुकीत न भूतो न भविष्यती यश गाठण्यासाठी भाजप सज्ज झालेली आहे. भाजप तर्फे जिल्ह्यात महासंपर्क अभियानाला सुरुवात करण्यात आली आहे. शक्ती केंद्रांवर बैठका, बूथ चे नियोजन करणे, प्रत्येक बुथवर बैठका घेऊन भाजपला संघटनात्मक दृष्ट्या मजबूत करणे, घर चलो अभियान इत्यादी कार्यक्रम जिल्ह्याच्या चौदाही तालुक्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याची माहिती डॉ. अनिल बोंडे यांनी दिली. ते म्हणाले की, सारथी-बार्टीतीच्या धरतीवर अनेक महापुरुषांच्या नावाने महायुती सरकारने महामंडळ निर्माण केली आहेत. खाटीक समाज महामंडळ, बारी समाज महामंडळ, तेली समाज महामंडळ, मत्स्य महामंडळ, काशीबा आर्थिक विकास महामंडळ इत्यादींचा त्यामध्ये समावेश आहे. प्रत्येक समाजाला मुबलक रोजगार मिळावा. तरुण-तरुणाईच्या कौशल्याला पाठबळ मिळावे यासाठी सर्व समाज घटकांचा विचार लक्षात घेऊन महायुती सरकारची वाटचाल सुरू आहे. भाजप तर्फे जिल्ह्यात 4 ऑक्टोंबर पासून महासंपर्क अभियान सुरू झाले आहे.



# दगडफेक; बाराशे जणांविरुद्ध गुन्हा दाखल, दगेखोरांची धरपकड सुरु



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )-** उत्तर प्रदेशातील गाजियाबाद येथे यती स्वामी नरसिंह महाराज यांनी केलेल्या वक्तव्यासंदर्भात अल्पसंख्याक समुदायातील काही व्यक्तींनी शुक्रवारी दुपारी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. पोलिसांनी सायंकाळी या प्रकरणात गुन्हा नोंदवला होता. असं असताना आपल्या तक्रारीची दखल पोलिसांनी घेतली नाही, अशी अफवा पसरवून वीस ते पंचवीस जणांचा मोठा जमाव पोलीस ठाण्याच्या परिसरात एकत्र आला. पोलिसांना काही कळायच्या आतच पोलीस ठाण्यावर या जमावानं दगडफेक केली.

या प्रकरणात पोलिसांनी शुक्रवारी एकाला अटक केली, तर शनिवारी सकाळी आठ जणांना ताब्यात घेतलं. शनिवारी दुपारी देखील पठाण चौक, लालखडी आदी भागात दगडफेक करणाऱ्यांना अटक करण्याची मोहीम पोलिसांनी राबवली.

एकूण 26 जण या प्रकरणात मुख्य आरोपी असून, बाराशे जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय. नागपुरी गेट पोलीस ठाण्यावर दगडफेक झाल्यानंतर पोलीस उपायुक्त सागर पाटील हे पोलीस ठाण्यातच ठाण मांडून आहेत. या प्रकरणात मुख्य आरोपी हा सय्यद जुबेर असून, त्याला लवकरच अटक करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेत पोलिसांच्या एकूण दहा गाड्यांची तोडफोड झाल्याची माहिती, पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी दिली. तर या घटनेत जवळपास 21 पोलीस जखमी झाले आहेत. दगडफेकीच्या गंभीर घटनेनंतर पोलीस आयुक्त नवीन चंदन रेड्डी यांनी नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत जमाबंदीचे आदेश दिलेत. नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत जमावबंदी लागू असताना शाळा आणि दुकान सुरू आहेत. आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत.

अटक करण्यात आलेल्या एका व्यक्तीला न्यायालयात हजर केलं जाणार आहे. या प्रकरणात अनेकांना अटक केली जाईल, असं पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी सांगितलं.

नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी एकूण 17 फिक्स पॉईंट लावले आहेत. तर परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडकोट बंदोबस्त लावण्यात आला.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# रस्ते अपघातात दोघांचा मृत्यू, दोन गंभीर जखमी

## शिरजगाव कसबा-देऊरवाडा मार्गावरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार (दि.5)**- शिरजगाव कसबा-देऊरवाडा रस्त्यावरील वीटभट्टीजवळ शनिवारी सकाळी 11 वाजताच्या सुमारास दुचाकींमध्ये झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर दोन तरुण गंभीर जखमी झाले. कुणाल नरेश भुते (18) व शेख मुस्ताक शेख गैसुद्दीन (32, दोन्ही रा. देऊरवाडा असे मृतांची नावे असून जखमींमध्ये



विनोद रामकृष्ण फिस्के (35, रा. देउरवाडा) व सारंग नामदेव संभे (18, रा. शिरजगाव कसबा) यांचा समावेश आहे.

माहितीनुसार, एमएच 27 डीके 1797 आणि एमएच 27 बीए 4734 या क्रमांकाच्या दुचाकींवर प्रत्येकी दोन युवक आपआपल्या कामानिमीत्त जात होते. दरम्यान शिरजगाव कसबा-देऊरवाडा रस्त्यावरील अकोटकर यांच्या शेतातील वीटभट्टीजवळील वळण रस्त्यावर दोन्ही दुचाकींची समोरासमोर धडक झाली. यात दोघांचा जागीच मृत्यू झाला, अन्य जखमी झाले. अपघातानंतर जखमींना तातडीने अमरावती जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले.

या घटनेच्या माहितीवरून शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांनी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुणाल नरेश भुते हा शिरजगाव कसबा येथील एका शाळेतील विद्यार्थी असून, इयत्ता 12 वीत शिकत होता. कुणाल भुते हा नेहमीप्रमाणे शाळेसाठी घरून निघाला होता, त्याने बसस्थानकावरून एका दुचाकीला चालकाला लिफ्ट मागितली.

पण मध्यंतरी अपघाताचा त्याचा बळी गेला. विशेष म्हणजे देउरवाडा गाव व शिरजगाव शहरातील शेकडो विद्यार्थी दररोज शाळेत येतात. शाळेच्या वेळेत एसटी बससेवा उपलब्ध नसल्यामुळे दररोज अनेक मुले दुचाकीचालकाकडे लिफ्ट मागताना दिसतात. या घटनेनंतर शाळेच्या नियमित वेळेत बससेवा सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# डाकीया डाक लाया, खुशी का पैगाम लाया!

## पोस्टमन प्रल्हाद कवटकर यांनी जिंकली वरूडवासियांची मने

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, (दि.5)**- पोस्टमन हा शब्द म्हटल्यावर खाकी गणवेशात सायकल चालविणाऱ्या माणसाची प्रतिमा डोळ्यासमोर येते. तथापि ते आपल्यासाठी किती महत्त्वाचे आहे याचा कोणी विचार केला आहे का? असेच एक प्रामाणिक, सेवेत तत्पर असलेले पोस्टमन वरुड डाक विभागाला लाभले आहे, त्यांनी त्यांच्या सौहार्दपुर्ण वागणुकीने वरूडकरांची मने जिंकली आहे. हिंदी चित्रपटाती एका गाण्याप्रमाणे ते पत्रातुन खुशी (आनंदाचे) का पैगाम आणतात आणि आवर्जून रामराम घेतात. प्रल्हाद रघुनाथराव कवटकर असे या पोस्टमन दादांचे नाव आहे.

बारावी पास झाल्यानंतर 39 वर्षांपूर्वी ग्रामीण भागात पोस्टमन व नंतर गावचे पोस्ट मास्तर झाले आणि त्यांचा हा कर्तव्याचा प्रवास आज जीवनाच्या उत्तरार्धात आला आहे. गव्हांडकुंड या गावापासून त्यांनी पोस्टमन च्या सेवेला सुरुवात



केली. भेमडी, जरुड येथे पोस्टमास्तर चे पद ही भुषविले. आजच्या डिजीटल, ऑनलाईनच्या युगात पत्र हे प्रत्येकासाठी आजही महत्वाचे संदेशवाहक आहे. ऊन, वारा, पाऊस असो तरीही पोस्टमन हे पत्र योग्य स्थळी पोहचवितो. प्रल्हाद कवटकर यांनी पत्र देतांना खुप काळजी घेतली. कुणाचा इंटरव्ह्यू असेल ती व्यक्ती घरी नसेल तर आवर्जून फोन करणे किंवा बाहेरगावी कुणी असेल तर तेथे जाऊन पत्र हातात देऊन आपले कर्तव्य पाडणे हा त्यांच्या कामाचा भाग. कुणाचे पोस्टात खाते आहे पण त्याला अर्जंट पैशांची गरज पडते, अशा गरजवंताला ग्रामीण भागात त्यांनी मदतही केली. प्रल्हादराव हे दिवसाला 150 च्या वर पत्र वाटतात. त्यात साधे, रजिस्टर, महत्वपूर्ण पत्र असतात. कुणाचा पत्ता बदललेला असेल तर दुस-या पत्यावर जाऊन ते पत्र देतात. पत्र देतांना ते खुशी का पैगाम आणतात आणि आवर्जून रामराम घेतात.त्यांच्या बोलण्याने त्यांनी वरूड करांची मने जिंकली असुन आपल्या वागणुकीने त्यांनी डाक विभागाची शान वाढवली आहे. पदवीधर एक मुलगी व एक मुलगा ,पत्नी असा त्यांचा संसार असुन ते सेवानिवृत्ती च्या उंबरठ्यावर येऊन पोहचले आहे.

### आम्हाला अभिमान वाटतो!

आमचे पोस्टमन प्रल्हादराव कवटकर यांची सौहार्द पुर्ण वागणुकीतून जनमानसातील प्रतिमा आम्ही लोकांकडुन जेव्हा ऐकतो. आम्हालाही अभिमान वाटतो.

**हेमंत शिंगरवाडे,**
**पोस्ट ऑफीसर डाक विभाग, वरूड.**

# बेलोरा विमानतळ लोकार्पणाची घिसाडघाई अमरावतीकरांची फसवणूक करणारी

## डॉ. सुनील देशमुख यांचा घणाघात



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.5)** - येत्या 9 ऑक्टोबर रोजी होऊ घातलेले बेलोरा विमानतळाचे लोकार्पण म्हणजे अमरावतीकरांची फसवणूक असल्याचा घणाघात माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केला आहे.

लोकार्पणासाठी एमएडीसीकडून लगबग सुरू असली तरी अद्याप नागरी विमान वाहतूक संचालनालयाची परवानगी मिळाली नाही. शिवाय अत्यंत महत्त्वाच्या एअर ट्रॅफिक कंट्रोल टॉवरचे कामही पूर्णत्वास आलेले नाही. त्यामुळे कामे अर्धवट असताना लोकार्पणाची घिसाडघाई केवळ निवडणुकीवर डोळा घेऊन घेतलेला निर्णय असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पायाभूत सुविधा व औद्योगिक विकासात बेलोरा विमानतळ मैलाचा दगड ठरणार आहे. परंतु, होऊ घातलेले लोकार्पण अर्धवट विमानतळाचेच असून, केवळ टर्मिनल बिल्डिंगचे काम पूर्ण झाले आहे.

### अपूर्ण असलेली कामे

प्रवासी विमानांच्या परिचालनाकरिता सर्वात महत्त्वाचे असते ते एअर ट्रॅफिक कंट्रोल टॉवर. विमानाचे लँडिंग आणि टेकऑफ याचे संपूर्ण नियंत्रणच याद्वारे केले जाते. याचे कार्यान्वयन अद्यापही अपूर्ण आहे. देशातील सर्व विमानतळांचे नियमन करणाऱ्या नागरी विमान वाहतूक संचालनालय (डीजीसीए) या संस्थेची परवानगी अद्याप मिळालेली नाही. त्याची प्रक्रिया सुरू आहे.प्रवासी विमानाची सेवा पुरवणाऱ्या ज्या कंपनीला या मार्गावर परवाना मिळाला आहे त्यांच्याकडून अद्यापही प्रस्तावित प्रवासी सेवेचा मार्ग, त्यांचे वेळापत्रक याबद्दल कोणतीही निश्चिती झालेली आहे. विमानतळ परिसरात हरीण, रोही यासारख्या जंगली प्राण्यांचा मोठा वावर आहे. हे सगळे प्राणी वनविभागाद्वारे रेस्क्यू करून दुसरीकडे शिफ्ट करण्यात येणार आहेत तेही काम अद्याप बाकी आहे. त्याशिवाय विमानांचे सुरक्षित टेकऑफ आणि लँडिंग शक्य होणार नाही.



विमानाचे उड्डाणच जर होणार नसेल तर घाईघाईत विमानतळाचे लोकार्पण करणे म्हणजे अमरावतीकरांची फसवणूक करणे होय. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर केवळ राजकीय लोकार्पण करणे एवढाच या मागचा उद्देश दिसतो.

**डॉ. सुनील देशमुख,**
**माजी राज्यमंत्री**

# रहदारीस अडथळा केल्याने डिजेमालकासह तिघांविरुध्द गुन्हा

**अमरावती**- सार्वजनिक रोडवर वाहन उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणार्या डीजेच्या मालकासह तिघांविरुध्द गाडगेनगर पोलिसांनी 3 ऑक्टोंबर रोजी गुन्हा नोंदविला. डिजे मालक अजित गजानन कोडके (रा. मिलींदनगर), संचित अरविंद्र चव्हाण (रा. अन्नपुर्णा कॉम्प्लेक्स, रहाटगाव) व अमित राजेंद्र भस्मे (रा. अनगडनगर, शेगाव) अशी आरोपींची नावे आहेत.

# ढाकना केंद्रातील शाळेचा शिक्षणाचा दर्जा घसरला

## भांडूमढाणा शाळेतील विद्यार्थ्यांना लिहता वाचता येईना

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि.5)**- चिखलदरा तालुक्यातील ढाकना केंद्रातील शाळाचा दर्जा घसरला असून शिक्षकच शाळेतून बेपत्ता राहत असल्याने येथील विद्यार्थ्यांना साधे लिहता-वाचता येत नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तसेच येथील शाळेत चक्क प्रशिक्षणार्थी असलेल्या विद्यार्थ्यांच्या भरवशावर शाळा चालत असून मुख्याध्यापकासह शाळेतील शिक्षक शाळेला विनाअर्जाचे शाळेतून गायब असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

चिखलदरा तालुक्यातील ढाकना केंद्रांतर्गत सात शाळा येतात अशातच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा भांडूमढाणा येथील शाळेत चार शिक्षक कार्यरत असतांना दोन शिक्षक गैरहजर आढळून आलेत तर एक शिक्षक शाळेतील मुलांना वाऱ्यावर सोडून शाळेच्या बाहेर फिरतांना आढळले. येथील पहिल्या वर्गातील विद्यार्थ्याला साधे 1 ते 100 पर्यंत व अ, आ, इ, ई वाचता येत नाही. तसेच वर्गखोल्या असूनही सर्व विद्यार्थी एकाच खोलीत बसलेली असतात. तर वर्ग सहा, सात, आठ वर्गात ऐकून पाटावर 33 विद्यार्थी असतांना शाळेत मात्र 15 विद्यार्थी एकाच खोलीत बसलेली आढळून आली व तेथील वर्ग 6 च्या विद्यार्थ्यास साधे साधे इंग्रजी शब्दाचा उच्चार कळत नाही. वर्ग 5 वी ची विद्यार्थ्याचीही हीच परिस्थिती आहे. मराठी विषयातील जोडाअक्षरे वाचता येत नाही, त्यामुळे या शाळेतील शिक्षकांच्या शिक्षणावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



भांडूमढाणा येथील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापकासह 3 शिक्षक कार्यरत आहेत, मात्र हे शिक्षक या ना त्या कारणाने शाळेला दांड्या मारत असतात. त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना साधे लिहता-वाचता येत नाही, त्यामुळे येथील शिक्षणाचा दर्जा खालावला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घ्यावी.

**संगीता शालीकराम बेठेकर, सरपंच, ढाकना.**

भांडूमढाणा येथील शाळेला मी स्वत: भेट देतो व तेथील शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासून शिक्षकावर कारवाई करतो.

**रामेश्वर माळवे,**
**गटशिक्षणाधिकारी, चिखलदरा.**

# त्या जखमी श्वानाच्या मदतीला धावली वारसा

## अज्ञात वाहनाच्या धडकेत झाले दोन्ही पाय निकामी

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.5)** - अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन्ही पाय निकामी होवून रस्त्याच्या कडेला पडून असलेल्य एका जखमी श्वानाच्या मदतीला येथील वारसा संस्था धावून आली. या संस्थेने पुन्हा एकदा प्राणीमात्रांवर उपचार करून भूतदयेचा परिचय दिला आहे. परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दोन दिवसांपुर्वी रात्री दहा वाजता सुमारास वारसा संस्थेच्या हेल्पलाइनवर नरेंद्र कुरवाडे याचा फोन आला, त्यांनी यावेळी सांगितले की, अमरावती मार्गावर कुरवाडे मेडिकल जवळ एका अज्ञात वाहनाने बेवारस कुत्र्याला धडक दिली. माहिती मिळताच वारसा संस्थेचे डॉ.प्रशांत चारे यांनी



घटनास्थळावर जाऊन पाहणी केली. अपघातग्रस्त कुत्र्याचे पुढचे दोन पाय पूर्णत: तुटले होते. डॉ. प्रशांत चारे यांनी लगेच कुत्र्याच्या पायाला प्लॅस्टर बांधून औषधोपचार केला. पुढील उपचार वारसा संस्था करीत आहे.

# येवद्यात शेतकऱ्याची गळफास लावून आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर (दि. 5)** - येवदा येथील एका शेतकर्याने नापिकिला कंटाळून गळफास लावून आत्महत्या केली. जमीलुद्दीन (रा. वडनेर गंगाई) असे मृताचे नाव आहे. या घटनेमुळे येवद्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. ही घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली.

येवदा गावावरून जवळच असलेले वडनेर गंगाई येथे जमीलुद्दीन शेत शिवार असून यंदा ओला दुष्काळ पडल्यामुळे शेती पीकाचे नुकसान झाले. त्यामुळे त्यांनी आत्महत्या केल्याची चर्चा आहे. शासनाने याकडे लक्ष देऊन शेतकर्याला आर्थिक मदत द्यावे, अशी मागणी नागरिक करीत आहेत. काँग्रेस अल्पसंख्याकाचे उपाध्यक्ष शोएब पठाण यांनी सुद्धा शासनाला पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. या घटनेचा पुढील तपास येवदा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज नळकांडे यांच्या करीत आहे.

# श्री संत रुपलाल महाराज स्मारक आराखडा बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, (दि.5)**- श्री संत रुपलाल महाराज यांच्या स्मारकासाठी जागा व काही अंशी निधी उपलब्ध करून दिला त्या स्मारकाला त्वरित काम लागावे यासाठी पूर्व नियोजित आराखडा तयार करण्यात आला.



त्या कामाची फलश्रुती ही वर्षपूर्तीलाच दि.1 ऑक्टो. 2024 रोजी विठ्ठल मंदिर येथे माजी मंत्री तथा आमदार संजय कुटे, रमेश घोलप यांच्या उपस्थितीत आराखडा बैठकीचे आयोजन करण्यात आले. होते सदरचे बैठकीमध्ये आगामी स्मारकाचा आराखडा सर्व समाज बांधवासमोर ठेवन्यात आला असून त्यामध्ये काही सूचना असल्यास दोन दिवसात कळवण्यात याव्या हे सुद्धा सांगण्यात आले.

ह्याप्रसंगी गेली एक वर्षापासून सतत सहकार्य करून समाजाच्या मागण्या पूर्ण करण्यास हातभार लावला असे आमदार संजय कुटे ह्यांचा वर्षपूर्ती निमित्य अखिल भारतीय बारी महासंघाचे अध्यक्ष रमेश घोलप ह्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. तर ज्या कामाला त्यासाठी सतत प्रयत्नरत असलेले रमेश घोलप ह्यांचा सुद्धा अखिल भारतीय बारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांकडून सत्कार करण्यात आला.

बैठकीला मतदार संघाचे माजी आमदार रमेश बुंदीले, माजी मंत्री संजय कुटे, महासंघाचे अध्यक्ष रमेश घोलप, कमलकांत लाडोळे यांच्यासह जालना, वालसावंगी, भारज, बुलढाणा, जळगाव जामोद वरवट बकाल, अकोट सिरजगांव कसबा, पांढरी,येथील बारी समाज बांधव मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

# वरुडच्या फ्रूट एक्स कंपनीमध्ये शेतकऱ्यांची फसवणूक

## एकाच दिवशी 28 रुपयांवरून 16 रुपये किलोचा भाव

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,(दि.5)** - संत्राच्या हर्रासादरम्यान शेतकरी व हर्रासकर्ते व्यापारी यांच्यात शेतकऱ्यांना योग्य तो भाव न मिळाल्यामुळे एकाच दिवशी दोन भाव कसे यावरून वाद होऊन अखेर शेतकऱ्यांना आपला माल फरुट एक्स कंपनीमधून परत न्यावा लागला.

मागील दोन वर्षापासून वरुड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फरुट एक्स कंपनी स्थापन केलेली आहे या कंपनीमार्फत शेतकरूयांचा संत्रा हर्रास पद्धतीने विकल्या जातो.



अशातच शुक्रवार (दि.4) ला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात सकाळच्या दरम्यान संत्राचा बाजार भाव 28 रुपये किलो प्रमाणे ठरविण्यात आला होता. त्यानंतर काही वेळाने शेतकरी संत्राचा हर्रास करण्यासाठी गेले, मात्र त्यावेळी त्यांचा संत्रा 28 रुपयावरून 16 रुपये घेतल्या गेल्याने शेतकऱ्यांमध्ये फरुट एक्स कंपनी विरोधात तीव्र संताप व्यक्त केला. अवघ्या काही तासात दोन रेट कसे असा प्रश्न शेतकऱ्यांनी विचारल्यानंतर कंपनीच्या व्यापारांनी शेतकऱ्यांसोबत वाद केल्यामुळे काही वेळ कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये तणावाचे वातावरण होते. तरीही शेतकरूयांच्या प्रश्नांची दखल कुणीच न घेतल्यामुळे काही शेतकऱ्यांनी तेथून माल परत न्यावा लागला. यामध्ये शेतकऱ्यांचेही आर्थिक नुकसान झाले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी व योग्य भाव मिळवून देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना योग्य तो भाव देण्यात यावा अशी मागणी अन्यायग्रस्त शेतकरी नितीन पेलागडे यांनी 'महासागर' शी बोलतांना सांगितले.

या संत्रा मंडी मध्ये संत्रा चांगला असला तर त्याचा भाव हा योग्यच मिळतो परंतु संत्र्याचे ग्रिडींग होऊन त्याचे भाव ठरविण्यात येतात, त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा भाव कमी वाटतो. शेतकऱ्यांचे मी स्वत: आणि सभापती पावडे यांनी समाधान केलेले आहे.

**दिनेश मानकर,**
**फरुट एक्स कंपनीचे प्रतिनिधी**

संत्रा पाहून त्याचे ऑक्शन ठरविण्यात येते चांगला संत्रा असला तर चांगला भाव येतो व थोडा खराब असल्यास त्याचा कमी भाव असे सूत्र या कंपनीचे असल्यामुळे यामध्ये कसल्याही प्रकारचा भेदभाव नाही, कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांना योग्य भाव मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे.

**बबलू पावडे,**
**सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, वरुड.**

# थांग-ता मार्शल आर्ट राष्ट्रीय स्पर्धेसाठी संघ ग्वालीयर रवाना



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.5)** - थांग ता फेडरेशन ऑफ इंडिया व मध्य प्रदेश थांग ता असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 31वी राष्ट्रीय जुनिअर थांग- ता मार्शल आर्ट चॅम्पियनशिप 2024 ग्वालिअर(मध्यप्रदेश )येथे दि 05 ते 07 ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या स्पर्धे करिता महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातील निवड झालेल्या- 34 खेळाडू व 4 ऑफिशिअल असे एकूण 38 जणांचा संघ अमरावती हुन रवाना झाला आहे. या संघामध्ये अमरावती, सातारा, सांगली, रायगड, मुंबई शहर, मुंबई उपनगर, अहमदनगर, छ. संभाजी नगर, इतक्या जिल्ह्यातील खेळाडूंची निवड झाली आहे. तत्पूर्वी दि. 01 ते 03 ऑक्टोबर रोजी अमरावती येथे ऑल महाराष्ट्र थांग ता असोसिएशन चे महासचिव महावीर धुलधर यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झालेल्या सर्व खेळाडूंचा स्पर्धा पूर्व तीन दिवसीय प्रशिक्षण जिल्हा क्रीडा संकुल अमरावती येथे घेण्यात आले. यावेळी संघ व्यवस्थापक रुपाली जहागीरदार, तांत्रिक सहाय्यक मनोज कांडकर, प्रशिक्षिका खुशबू मालधुरे, हे उपस्थित होते. सदर खेळाडूंना राज्य संघटनेचे अध्यक्ष मुकुंद धुलधर, पदमश्री प्रभाकर रावजी वैद्य, माधुरी चेंडके, राजेश महात्मे, सी ए.वृंदा अट्टल, जिल्हा क्रीडा अधिकारी संतोष महात्मे, क्रीडा उपसंचालक तसेच जिल्हा संघटनेतील सर्व पदाधिकारी यांनी पुढील वाटचालीस खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहे.